!! <u>प्रेसनोट</u> !! दि.०३/०८/२०२४

## <u>१९३० सायबर हेल्पलाईन, मुंबईने मागील सात महिन्यामध्ये नागरीकांचे सायबर गुन्हयात फसवणूक झालेले वाचविले १०० कोटी रूपये !!</u>

मुंबई शहरातील नागरीकांची सायबर गुन्हयांमध्ये फसवणुक झालेल्या तक्रारींची नोंद करणेकामी व फसवणूक रक्कम सबंधित बॅक खात्यामध्ये गोठविण्याकरीता दि. १७/०५/२०२२ रोजी पासुन मुंबई पोलीस गुन्हे शाखे अंतर्गत १९३० हेल्पलाईन कार्यान्वित करण्यात आली असुन सदर कक्षामध्ये ०३ अधिकारी व ५० अंमलदार ३ शिफ्टमध्ये कार्यरत आहेत याद्वारे सायबर गुन्हयात आर्थिक फसवणुक झालेले तक्रारदार यांनी त्यांची फसवणुक झालेनंतर १९३० हेल्पलाईनवर तात्काळ संपर्क केला असता NCRP पोर्टलवर तक्रार नोंद करून नागरिकांची फसवणुक झालेली रक्कम सबंधित बॅक खात्यांवर गोठविण्यात येते.

दिनांक ०१/०१/२०२४ रोजी पासुन १९३० सायबर हेल्पलाईनद्वारे एकुण **३५,९१८** तक्रारी नोंदवील्या असुन यामध्ये मुख्यत्वेकरून शेअर ट्रेडींग/इन्वेस्टमेंट फ्रॉड, फेडेक्स व इतर कुरीअर फ्रॉड, डिजीटल अरेस्ट फ्रॉड, ऑललाईन टास्क फ्रॉड इत्यादी प्रकारच्या आशयाच्या तक्रारी नागरिकांद्वारे नोंदवील्या आहेत. सदर तक्रारी प्राप्त होताच कर्तव्यावर असलेले अधिकारी व अंमलदार हे तात्काळ संबधित बॅक, वॉलेट, मर्चंट इत्यादी नोंडल अधिकारी यांच्याशी समन्वय साधुन व फॉलोअप घेवून फसवणुक रक्कम ज्या खात्यात गेली आहे ती रक्कम संबधित खात्यांवर गोठवितात.

अशा प्रकारे मागील सात महिन्यांच्या कालावधीत नागरीकांची सायबर गुन्हयांमध्ये फसवणूक झालेली **रू.१००,८४,५७,८५४/- (शंभर कोटी चौ-याऐंशी लाख सत्तावन्न हजार आठशे चौपन्न रूपये)** एवढी रक्कम संबधित बॅक खात्यांवर गोठवून वाचविण्यात १९३० सायबर हेल्पलाईन पथक, गुन्हे शाखा मुंबई पथकास यश आले आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. विवेक फणसळकर, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. श्री. देवेन भारती, विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. श्री. लखमी गौतम, पोलीस सह आयुक्त, गुन्हे, मा. श्री. शशीकुमार मिना, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री. दत्ता नलावडे, पोलीस उप आयुक्त, सायबर गुन्हे, मा. श्री. आबुराव सोनावणे, सहा. पोलीस आयुक्त, सायबर गुन्हे विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. दत्ताराम चव्हाण, व.पो.नि. पश्चिम प्रा. सायबर पो. ठाणे, पोउनि मंगेश भोर, पोउनि रूपाली कुलथे, पोउनि निवृत्ती बावस्कर १९३० सायबर हेल्पलाईन, गुन्हे शाखा, मुंबई यांच्या पथकाने नमूद कालावधीत पार पाडली आहे.

**<u>शेअर ट्रेडिंग फ्रॉड प्रकारच्या गुन्हयापासुन वाचण्याकरिता नागरीकांनी खालील काळजी घ्यावी</u>**.

- व्हॉट्सअप, फेसबुक, इन्स्टाग्राम, यु टयुब व टेलिग्राम या सारख्या सोशल मिडीयावर भरघोस नफा कमवून देण्या-या शेअर ट्रेडिंगच्या जाहीरातीव्दारे सदरची फसवणूक केली जाते.

- सदर फ्रॉड मध्ये सायबर गुन्हेगार फसवणूक करण्यासाठी खोटया व बनावट शेअर ट्रेडींग ॲपचा व वेब साईटचा वापर करतात असे करतांना नामाकिंत कंपनीच्या नावाचा वापर केला जातो.
- कोणत्याही प्रकारची APK फाईलव्दारे शेअर ट्रेडींग ॲप डाउनलोड करू नये व शेअर ट्रेडींग करतांना वेबसाईटची/वेबपेजची सत्यता तपासुन पहावी.
- व्हॉट्सअप, फेसबुक, इन्स्टाग्राम, यु टुब व टेलिग्राम या सारख्या सोशल मिडीयावर भरघोस नफा कमवून देण्या-या शेअर ट्रेडिंगच्या जाहीरातींची शहानिशा करावी व गुंतवणूक करतांना सावधनता बाळगावी.
- सदर फ्राडमध्ये सायबर गुन्हेगार विविध वैयक्तीक बॅक खात्यांवर पैसे पाठविण्यास प्रवृत्त करतात. अशा प्रकारे एनएसई/बीएसई व्दारे रजिस्टर कोणतीही शेअर ट्रेडींग कंपनी वैयक्तीक बॅक खात्यांवर पैसे पाठविण्यास सांगत नाही.

**Fedex Scam किंवा इतर कुरीयर कंपनीचे नावे Scam प्रकारच्या गुन्हयापासुन वाचण्याकरिता नागरीकांनी खालील काळजी घ्यावी.**

- अग्रनामांकित कुरीयर कंपन्याचे प्रतिनीधी असल्याचे भासवून आपले बॅक खात्यांमधुन अनियमित व्यवहार झाल्याचे किंवा आपले नावे ड्रग्स, हत्यारे, हवाला ट्रान्झेक्शन झाल्याचे सांगुन येणारे कॉल हाताळतांना सावधानता बाळगावी.
- पोलीस अधिकारी, इन्कम टॅक्स अधिकारी किंवा इतर सरकारी अधिकारी असल्याची बतावणी करून सोशल मिडीयाचे माध्यमातून ओळखपत्र किंवा नोटीस पाठवून आपल्याला अटक करण्यात येईल असे भय दाखवले गेल्यास योग्यती शहानिशा करून तसेच घाबरून न जाता नजिकच्या पोलीस ठाणेस संपर्क करावा.
- संभ्रमित होवून कोणतेही आर्थिक व्यवहार करू नये किंवा अनोळखी व्यक्तीस व बॅक खातेवर पैसे पाठवू नये.

तरी नागरीकांना आवाहन करण्यात येते की, आपण कोणत्याही प्रकारच्या आर्थिक सायबर फसवणुकीला बळी पडल्यास तात्काळ १९३० हेल्पलाईनवर संपर्क करावा जेणेकरून आपली फसवणूक झालेली संपुर्ण किंवा जास्तीत जास्त रक्कम वाचली जाईल.

**# cybersafemumbai**

**Report Cyber Crime On Helpline 1930** **OR**

**https://cybercrime.gov.in**